ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या सामाजिक विषमता निर्मूलन कार्याचे महत्त्व

प्रा. के. बी. शिरसे
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
गोपीकाबाई सीताराम गावंडे महा.
उमरखेड जि. यवतमाळ.

## प्रस्तावना



राष्ट्रसंत गाडगेबाबांनी समाजामध्ये असलेल्या अनिष्ट रुढी,प्रथा, अंधश्रध्दा, अस्पृश्यता, अज्ञान, दारिद्रय नाहीसे करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यांनी विषमतेच्या अंधारात खितपत पडलेल्या अस्पृश्य समाजाला समतेचा, बंधुभावाचा आणि अंतरीक प्रेमाचा मार्ग दाखवीला. सामाजिक समतावाद हा बाबांच्या अहिंसा, करुणा, दया विषयक विचाराचा मुख्य गाभा होता. समता हा मानवतेचा पाया असतो. असा बाबांचा ठाम विश्वास होता. म्हणुन आपल्या किर्तनातुन बाबांनी समतेचा मार्ग प्रशस्त केला. त्यांच्या सदाराचा, समन्वयाचा, ममतेचा बंधुभावाचा, सहकार्याचा आणि सौजन्याचे कार्याचा आढावा पुढे घेण्यात आला आहे.

गाडगेबाबांचा जन्म अमरावती जिल्हयातील शेंडगाव येथे दि. 23 फेब्रुवारी 1876 रोजी झाला. त्यांचे मुळ नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर होते. समाजातील दैन्य, दारीद्रय, अडाणीपणा, अज्ञान ,अंधश्रध्दा आणि अनिष्ठ चालीरीती पाहुन ते अत्यंत व्यथीत होते. त्यांनी मोह, माया संसाराची सर्व बंधने तोडुन दिली, आणि मानव सेवेसाठी उर्वरीत आयुष्य घालवण्याचा निश्चय केला रंजल्या गांजल्याची सेवा हेच त्यांचे ध्येय झाले. मानवसेवा करीत या कर्मयोग्याचे 20 डिसेंबर 1956 रोजी अमरावतीजवळ पेढी नदीच्या तिरावर निधन झाले अमरावती येथे त्यांची समाधी आहे. गाडगेबाबा आपल्या प्रत्येक कीर्तनातून अस्पृश्य समाजाशी द्वेषभावाने वागणाऱ्या समाजावर कोरडे ओढत होते. पण ते अस्पृश्य हा शब्द न वापरता शिवाशिव हा शब्द वापरीत. आपल्या किर्तनातुन खडया आवाजात दुर हो दुर हो शिवशिव शिवशिव अशी स्पृश्य समाजाची नक्कल करीत अस्पृश्यता हा समाजाला लागलेला कलंक आहे हे पटवून देत बाबा म्हणत जगात जाती फक्त दोनच एक पुरुष व दुसरी स्त्री तिसरी जातच नाही जो कोणी जात विचारत असेल तो महामूर्ख होय. कोणी जात विचारली तर त्याला मी आहे म्हणुन सांगा जनावरात जसे गाढव, बैल कुत्रा, म्हैस इत्यादी जाती आहेत. मानवप्राण्यात नाहीत तसे असते तर जनावरात हा गाढव, हा बैल असे ओळखता येते तसेच मनुष्य जातीत हा महार हा कुणबी हा ब्राम्हण असे ओळखता आले असते सर्व मुले स्वच्छ कपडयात एका रांगेत उभे केली तर अमूक एक मुलगा तेल्याचा की एक मांगाचा हे ओळखता येत नाही लोकांनी जातीभेदाचे उगाच बंध माजवले आहे. आता तरी डोळे उघडा कोणालीही निच मानु नका, फक्त आपल्या देशातच शिव शिव शब्द आहे. रशिया , अमेरीका ,चिनमध्ये नाही एकुन उपस्थित समुदायाला समतेचो डोस पाजत असत सामाजिक स्वास्थासाठी अस्पृश्यतेचा नायनाट करणे आवश्यक आहे. असे त्यांचे मत होते.

हिंदु धर्मातील जातीयवादाची , अस्पृश्यतेची गाडगेबाबांना चिड होती 19 जुलै 1954 च्या नाशिक येथील किर्तनामध्ये बाबा म्हणतात की, अस्पृश्यता हा कलंक आहे मानसाने मानसाला कमी लेखावे यासारखा अधर्म नाही. ब्राम्हणापासुन महारापर्यंत सगळी माणसे एकाच होडीतील प्रवासी आहेत कुणी मोठा नाही कुणी लहान नाही. जातीची बंधने माणसांनी निर्माण केले आहेत. एकाच देवाची आपण लेकरे आहोत. त्यात भेदाभेद गो.नी दांडेकर यांनी स्मरण गाथा चारित्रात म्हटले आहे की, गाडगेबाबांच्या पंक्तीत भेदाभेद नाही. गाडगेबाबांनी सहकाऱ्यात सामाजिक समतेचे बिजारोपन केले. त्यांच्या अनुयायांनामध्ये जसे ब्राम्हण होते तसेच अस्पृश्यदेखील होते. त्यांच्या महार अनुयायामध्ये अभिमान बुवा हे पट्टीचे किर्तनकार होते.

गाडगेमहाराजांनी कीर्तन भजनातुन अस्पृश्यता निवारण्याचा केवळ उपदेश केला नाही तर रचनात्मक कार्य केले. तमाम महाराष्ट्राचे कुलदैवत पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपुरला इतर हिंदु वारकऱ्याप्रमाणेच अस्पृश्य वारकरीही वारीला जात असत. परंतु अस्पृश्यतेमुळेच त्यांना कोणीही जवळ करीत नसत. त्यांच्या राहण्याची सोय नसे. पाऊसाळयाच्या दिवसात त्यांचे हाल होत असत बाबांनी त्याची जाणीव झाल्याने 1917 साली पंढरपुर येथे पन्नास हजार रुपये खर्चुन सर्व साईनीयुक्त "संत चाखामेळा धर्मशाळा"बांधली या धर्मशाळेत अस्पृश्य यात्रेकरुंच्या राहण्याची सोय केली. या धर्मशाळेत दलित विद्यार्थ्यांना राहण्याची सुविधा केली. नंतर ही धर्मशाळा त्यांनी 1945 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वाधीन केली. पश्चिम विदर्भातील यवतमाळ येथे वऱ्हाड महार सुधारक मंडळाच्या चोखामेळा फ्रि बोंर्डीगला गाडगे महाराजांनी 1928 मध्ये भेट दिली तसेच त्यांना स्वयंपाकाकरीता 334 रुपये किंमतीची पितळी भांडी घेऊन दिली गाडगेबाबांचा अस्पृश्यता निवारण्याचा प्रभाव त्यांच्या शिष्यमंडळीवर पडत असे त्यांचे शिष्य ह.भ.प मुकुंद महाराज यांनी हरिजनाकरीता मंदीरे, विहरी, हॉटेल,धर्मशाळा इत्यादी सार्वजनीक ठिकाणे खुली करावीत यासाठी जनजागृती दौरा काढला.

गाडगेबाबांनी तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. पंढरपुर, देहु, नाशिक, आळंदी, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी बाबांच्या धर्मशाळा होत्या. हया धर्मशाळेत सर्व जाती जमातीच्या नागरीकांना राहता येत असे अस्पृश्यांच्या राहण्याची सोय व्हावी म्हणुन ऋणानुमोचन या ठीकाणी 1912 मध्ये त्यांनी धर्मशाळा बांधली. मोतीराम बुवा पायरुजी यांनी याकामी मोलाचे सहाकर्य केले पंढरपुर येथील चाखामेळा धर्मशाळा सर्व सोईनियुक्त होती 1945 साली ही धर्मशाळा डॉ बाबासाहेब आंबेडकरांकडे सोपविली . या धर्मशाळेतील बोंर्डीगमध्ये 25 ते 40 मुले राहत असत. वसतीगृह हस्तांतरीत करतांना स्वतःगाडगे महाराज ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील उपस्थीत होते. महाराष्ट्रातील तीन शिरोमणीचा हा अभुतपुर्व संगम होता. या प्रसंगाचे वर्णन स्वतः डॉ आंबेडकरांनी केले आहे. यावेळी गाडगेबाबा म्हणाले की, धर्मशाळेत मुलांचे वसतीगृह चालवत जा, मुलांना शिकु द्या, आपण शिकले कुळाचा उध्दार केला. मुलांना शिकवा मोठे होवुद्या. गाडगेबाबा अस्पृश्यांना शिक्षणाचे महत्व सांगतांना डॉ. आंबेडकरांचे उदाहरण देत आंबेडकरासारखे शिका ,मोठे व्हा असे अवाहन करीत असत. शिकला नाही तर खटाऱ्याच्या बैलासारखी अवस्था होईल. असे ते निक्षून सांगत असत. डॉ. आंबेडकरानी गाडगे महाराजांबद्दल आदर होता त्यांच्याबद्दल ते म्हणत गाडगेबाबांसारखे संत आपल्या देशात पाहीजेत. त्यांना तुमच्या मनाची धनाची पर्वा नाही. त्यांना ते खरे मानवधर्मी संत आहेत .

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मातराची घोषणा केल्यानंतर संभावीत धर्माबाबत गाडगेबाबांशी चर्चा केली होती. तेव्हा गाडगेबाबांनी आंबेडकरांना मुसलमान अथवा ख्रिस्ती होऊ नका असा सल्ला दिला होता. व डॉ. आंबेडकरांनी गाडगेबाबांचा सल्ला मानण्याचे आश्वासन दिले होते. यावरुन दोघांच्या विचारांची व परस्पर विश्वासाची प्रचती येते .

सारांश संत गाडगे बाबांचे कार्यक्षेत्र व कार्यकाळ सत्यशोधक चळवळीचा कार्यकाळ सारखाच होता. गाडगेबाबांनी रचनात्मक मार्गाने अस्पृश्यता , जातीभेद , स्त्री – पुरुष विषमता , ग्रामीण शोषण याविरुध्द कार्य केले. स्वच्छता शिक्षण रुढी –परंपरा अंधश्रध्दा या मुद्यावर ग्रामीण जनतेच्या पातळीवर कार्य केले त्याचबरोबर सत्यशोधकांनीही शैक्षणिक विकास जातीयता नष्ट करणे , अस्पृश्यता नष्ट करणे स्त्री –पुरुष समानता प्रस्थपित करणे, सामाजिक रुढी , परंपरा या विरोधी जनजागृती करणे. इत्यादी मुद्यांनी समाज प्रबोधनाचे कार्य केले इतर संताप्रमाणे गाडगेमहाराज हे पुजा , प्रार्थना , दान , धर्म ,यज्ञयाग ,कर्मकांड या चक्रात अधिक आडकले नाहीत. सामान्य मानसाशी सतत संवाद ठेवत नवसमाज निर्मीतीचा रथ आपल्या रचनात्मक व प्रबोधन कार्याने पुढे नेण्याची काम अत्यंत प्रामाणिपणे व सातत्याने केले.

## संदर्भसुचि


| | | |
|---|---|---|
| 1) | भगत,रा.तु. (संपादक) | श्री गाडगेबाबा गौरव ग्रंथ |
| 2) | लोखंडे, भाऊ. | डॉ. आंबेडकरी सैनीकांची मुक्तीगाथा भाग पहीला |
| 3) | देशमुख, अ.गु. (संपादक) | जनता जनार्धन मालीक 1 ऑगस्ट 1954 |
| 4) | दांडेकर, गो.नी. | स्मरन गाथा 1973 |
| 5) | सावरकर, सुदाम,. | तमोमुक्ती श्री गाडगेबाबा 1981 |
| 6) | ठाकरे ,के.सी. | गाडगेबाबा |
| 7) | कवडे, पांडुरंग बालाजी. | संत गाडगेमहाराज उर्फ गाधडे महाराज यांचे चरीत्र 1939 |
| 8) | मकेसर, विठ्ठल दशरथ. (प्रकाशक) | वऱ्हाड महार सुधार मंडळ यवतमाळ अहवाल जुलै 1927 ते मार्च 1929 |
| 9) | भगत प्राचार्य रा.तु. (संपादक) | निवडक गाडगेबाबा |
| 10) | दांडेकर गो. नी | गाडगे महाराज |
| 11) | जाधव आबासाहेब | राष्ट्रीय संत गाडगेबाबा |
| 12) | शिंदे बालाजी | गाडगे बाबांचे विचारधन |